# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
(शिक्षण विभाग)

क्रमांक :17057/शि. वि./2014 दिनांक : 11 /03/2014

**परिपत्रक**

**प्रति,**

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
प्राथ./उच्च प्राथ. शाळा, म.न.पा. नागपूर

**विषय :–द्वितीय सत्रांत परीक्षा 2014 करिता प्रश्नोत्तर पत्रिका शालेय स्तरावर तयार करून परीक्षा शाळा स्तरावर घेण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक पी.आर.ई./2010 (136/10) प्राथमिक–5 दि. 20 ऑगष्ट 2010 अन्वये RTE च्या नियमावलीप्रमाणे कोणतीही परीक्षा शाळास्तरावर घेण्याचे आदेशीत असल्याने सत्र 2014 ची द्वितीय सत्रांत परीक्षा शाळा स्तरावरच घेण्यात यावी. मा. उपायुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार परीक्षा पेपर बाबत खालील प्रमाणे निर्देश आहेत.

1) शाळेनी प्रश्नोत्तर पत्रिका आपले स्तरावर तयार करावी.
2) तयार करण्यात आलेल्या मुळ प्रश्नोत्तर पत्रिकेच्या झेरॉक्स प्रती काढून सर्व विद्यार्थ्यांना वितरीत करावे.
3) झेरॉक्स प्रतिचा खर्च (मागेपुढे प्रत रू. 2 कमाल मर्यादा) शाळेनी आपले स्तरावर करून झालेल्या खर्चाचे देयक उपयोगिता प्रमाणपत्रासह तयार करून आपले झोनचे शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावे.
4) खर्चाचे देयके सादर करतांना बिलाच्या मागे मु.अ. चा स्टॅम्प लावून सही करून सादर करावे.
5) परीक्षा झाल्यानंतर झेरॉक्स प्रतीचे देयके (उपयोगिता प्रमाणपत्रासह)15 दिवसाचे आत शाळा निरिक्षकांकडे सादर करावे, अन्यथा त्यानंतर प्राप्त देयकावर विचार केला जाणार नाही.

**परीक्षेबाबत कालावधी खालीलप्रमाणे नमूद आहे.**

1) इयत्ता 1 ते 5 दि. 25/3/2014 ते 01/04/2014
2) इयत्ता 6 ते 8 दि. 2/4/2014 ते 15/4/2014

वरील नमुद दिनांकात परीक्षा घेण्यास ज्या मु.अ. यांना अडचण असल्यास, त्यांनी तसा प्रस्ताव तयार करून मा. शिक्षणाधिकारी यांची मंजुरी घेऊनच परीक्षा घ्यावी.

(मा. अपर आयुक्त यांचे दिनांक 01.03.2013 चे आदेशान्वये)

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) मा. अपर आयुक्त, म.न.पा., नागपूर
2) मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर
3) शाळा निरीक्षक, झो.क्र. 1 ते 10, म.न.पा., नागपूर

E:\VAN-FEB\VAN-09\Dighore Sir

# व्दितीय संत्रात परीक्षा 2014 (परीक्षेसंबंधी सुचना)

1. मुख्याध्यापकांनी दिलेल्या कालावधीत वेळापत्रक तयार करून लेखी परीक्षा घेण्यात याव्यात.
2. कला, कार्यानुभव, शारिरिक शिक्षण व आरोग्य या विषयांचे 100 गुणांचे आकारिक मुल्यमापन घेण्यात यावे या विषयांची लेखी चाचणी घेण्यात येऊ नये.
3. इयत्ता 1 ली 2 री ची इंग्रजी विषयाची लेखी चाचणी घेण्यात येऊ नये. इंग्रजी विषयाची तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी.
4. आठ शैक्षणिक साधन तंत्रे आणि तंत्राचा वापर करून विद्यार्थ्यांचे आकारिक मुल्यमापन करावेत.
5. संकलीत मुल्यमापनात लेखी, तोंडी व प्रात्याक्षिकावर गुणदान करण्यात यावे.
6. विद्यार्थ्यांच्या वैशिष्टय पूर्ण बाबींची नोंद आकारिक मुल्यमापनात घेण्यात यावी.
7. आकारिक मुल्यमापनात 8 पैकी किमान 5 साधन तंत्रांचा वापर करणे आवश्यक राहील. दैनंदिन निरीक्षण या साधन तंत्राला गुणदान करण्यात येऊ नये.
8. निकाल दर्शक तक्त्यात श्रेणी पध्दतीचा वापर करण्यात यावा.

| श्रेणी पद्धतीचा वापर | |
|---|---|
| 91% ते 100% | अ – 1 |
| 81% ते 90% | अ – 2 |
| 71% ते 80% | ब – 1 |
| 61% ते 70% | ब – 2 |
| 51% ते 60% | क – 1 |
| 41% ते 50% | क – 2 |
| 33% ते 40% | ड |
| 21% ते 32% | ई – 1 |
| 20% व त्यापेक्षा कमी | ई – 2 |

टिप :– " ड " व त्याखालील श्रेणीतील विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करून किमान "क – 2 " श्रेणी पर्यंत आणावे.

रोजचे पेपर्स रोजच शाळेत तपासून घ्यावेत. सर्व तक्ते, गुणपत्रिका टी.सी. बुक कार्यालयातर्फे मिळतील. (दिनांक व वेळ वेगळया परिपत्रकांव्दारे कळविण्यांत येईल.

| झोन क्र. | झोनचे नांव | शाळा निरिक्षकांचे नांव | केंद्र शाळेचे नांव |
|---|---|---|---|
| झोन नं. 1 | लक्ष्मीनगर | श्री. संजय दिघोरे | विवेकानंद नगर हिंदी प्राथ. शाळा |
| झोन नं. 2 | धरमपेठ | सौ. विद्या चंदेल | रामनगर मराठी उच्च प्राथ. शाळा |
| झोन नं. 3 | हनुमाननगर | कु. सुषमा बावनकर | दुर्गानगर मराठी उच्च प्राथ. शाळा |
| झोन नं. 4 | धंतोली | श्री. सुभाष लाडे | नवी शुक्रवारी हिंदी प्राथ. शाळा |
| झोन नं. 5 | नेहरूनगर | सौ. प्रिती बंडेवार | आजमशहा मराठी उच्च प्राथ. शाळा |
| झोन नं. 6 | गांधीबाग | श्री. धनराज दाभेकर | पन्नालाल देवडिया हिंदी प्राथ. शाळा |
| झोन नं. 7 | सतरंजीपूरा | सौ. विणा ठाकरे | नयापुरा हिंदी उच्च प्राथ. शाळा |
| झोन नं. 8 | लकडगंज | सौ. खुदरे | नवा बगडगंज मराठी प्राथ. शाळा |
| झोन नं. 9 | आसीनगर | श्री. काजी मुजाहिद्दोदीन | बाळाभाऊपेठ हिंदी प्राथ. शाळा |
| झोन नं. 10 | मंगळवारी | श्रीमती माया पजई | आर. बी. जी. जी CRC सेंटर |

- इयत्ता 1 ते 8 ची तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा वर्ग शिक्षकांनी ( मुख्याध्यापकांचे मार्गदर्शनाखाली) 14 मार्च ते 22 मार्च 2014 या कालावधीत घ्यावी.
- वार्षिक निकाला संबंधीचे सर्व कामकाज 22 एप्रिल 2014 पर्यंत पूर्ण करावेत.
- निकाल पत्रकांवर सहया दिनांक 24,25 एप्रिल 2014 या दोन दिवसात सकाळी 8.00 ते 12.00 या वेळात झोन निहाय केंद्र शाळेत करण्यात येतील.
- विद्यार्थ्यांची प्रमोशन तारीख 30 एप्रिल 2014 नमूद करावी.
- विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षेचे निकाल 1 मे 2014 रोजी जाहिर करावे व महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम घेण्यात यावा.
- शालेय सत्र 26 जून 2013 ते 30 एप्रिल 2014 धरून कामाचे दिवस काढण्यात यावेत.
- ज्या शाळांमध्ये इयत्ता 8 वी चे वर्ग आहे, त्यांनी इयत्ता 8 वी उत्तीर्ण च्या विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र देऊन जवळच्या म.न.पा. माध्यमिक शाळेत प्रवेश देण्याबाबत सुचना देण्यात यावी.
- ज्या शाळेत 1 ते 4 वर्ग आहेत त्यांनी 5 वा वर्ग व 1 ते 7 वर्ग आहेत त्यांनी 8 वा वर्ग सुरू करणे अनिवार्य आहे.

➢ पटनोंदणीचे स्वतंत्र रजिस्टर ठेवावे.
➢ टि.सी.बुक मध्ये व डिक्लेरेशन फॉर्म मध्ये आईच्या नावाचा कॉलम नमूद करावा.

- **निकालपत्रकासोबत खालील प्रपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

1) शाळेसबंधी निकालदर्शक तक्ता – 2 प्रती
2) शाळा कर्मचारी माहिती दर्शक तक्ता 3 प्रती
3) सहामाही गोषवारे 2 प्रती
4) शाळा दुरुस्ती 2 प्रती
5) स्थिती दर्शक तक्ते 3 प्रती
6) गुणवत्तेनुसार वर्ग निहाय गुणानुक्रमे पहिल्या पाच विद्यार्थ्यांची यादी 1 प्रती
7) पटनोंदणी केल्याबाबतचे रजिस्टर सोबत आणावे.
8) अनूसुचित जाती जमाती अल्पसंख्याक आणि BPL दर्शक तक्ता 2 प्रती मुले + मुली = एकुण असा गोषवारा काढावा.
9) मुल्यमापन पंजी

कार्यालयीन अधिकारी, शिक्षण सल्लागार समिती सदस्य म.न.पा. परीक्षा व्यवस्थेबाबत पाहणी करतील.
**शालेय पटनोंदणी** :– पटनोंदणीबाबत 2014 या वर्षाचे स्वतंत्र रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे.

**खालील विहित रकान्यात पटनोंदणीची माहिती नमूद करावी.**

| अ. क. | भेटीचा दिनांक | विद्यार्थ्यांचे नांव | जात | जन्मतारीख | वय पूर्ण वर्षात | पालकांचे नांव/ पूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक | पालकांची स्वाक्षरी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

- पटनोंदणी कार्य सोपविलेल्या शाळेतील शिक्षकांची नांवे, शिक्षकांनी पटनोंदणी केलेली विद्यार्थी संख्या, शाळेत दाखल केलेली विद्यार्थी संख्या हा गोषवारा मुख्याध्यापकांनी रजिस्टरवर काढणे आवश्यक आहे.
- शाळेकरिता पटनोंदणी आवश्यक राहील. मुख्याध्यापकांनी पटनोंदणी बाबतची उदिष्टे निश्चित करुन घ्यावी. प्रत्येक शिक्षकांना किमान दहा विद्यार्थ्यांच्या भरतीचे लक्ष्य ( Target ) देण्यात आलेले आहे.
- 26 जून 2014 शाळा सुरु होण्यापूर्वी किमान दोन आठवडे अगोदर पटनोंदणी पंधरवाडा समारंभपूर्वक साजरा करावा. शाळा व्यवस्थापन समिती पालकसमिती, माता पालक संघ, माजी विद्यार्थी, वार्डाचे सन्माननीय नगरसेवक व त्यांचे कार्यकर्ते वस्तीमधील ज्येष्ठ नागरीकांची मदत पटनोंदणीकरिता घेण्यात यावी.
- माहे जुलै 2014 मध्ये संपूर्ण महिनाभर पटनोंदणी करावी लागेल. याबाबतचे पूर्व नियोजन मुख्याध्यापकांनी करावे. इयत्ता 1 लीत यावर्षीपेक्षा किमान 30% नी भरती वाढवीणे आवश्यक आहे.
- पटनोंदणीत 6 ते 14 वयोगटाचे प्रवेशपात्र विद्यार्थी नोंदवावेत. अपंग विद्यार्थ्यां करीता 6 ते 18 वयोगट आहे. पत्यासह नोंदी घ्याव्यात. डिक्लेरेशन/प्रवेश फॉर्म भरतांना विद्यार्थ्यांचे आईचे नांव लिहण्यात यावे.
- उन्हाळयाच्या सुटीचे कालावधीत शाळा बंद राहणार नाही. शाळेचे कार्यालय सकाळी 7 ते दुपारी 12 वाजेपर्यंत उघडे राहील व या काळात संगणक कक्ष सुरू ठेवावे. याबाबत मुख्याध्यापकांनी विशेष खबरदारी घ्यावी.
- उन्हाळयाच्या सुटीत शाळेत शिक्षकांच्या पाळया लावाव्यात प्रत्येक शिक्षकाला ठराविक दिवस डयुटी देण्यात यावी. यात पटनोंदणीसाठी व नवीन वर्ग तुकडी व नवीन शाळा उघडण्यासाठी प्रयत्न व्हावेत. शाळेचे चपराशी यांना उन्हाळयाची सुट्टी नसते याची जाणीव त्यांना करून देण्यात यावी. त्यांनी दररोज सकाळी 7.00 ते दुपारी 12.00 पर्यंत शाळेत उपस्थित राहणे अनिवार्य आहे. ही बाब चपराश्यांचे लक्षात आणून द्यावी. त्यांची स्वाक्षरी नोटीस बुकात घेण्यात यावी. जे चपराशी शाळेत गैरहजर आढळतील त्यांचे वेतन कापले जाईल तसेच त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही केली जाईल. याची जाणीव त्यांना नोटिस द्वारे करून दयावी.

**टिप :–** 1) परीक्षेच्या काळात सर्व शाळा सकाळ पाळीत लावण्यात याव्यात.
2) उन्हाळयाची सुटी दिनांक .06/05/2014. ते 25/06/2014 पर्यंत राहील.
3) नवीन सत्रात शाळा दि. 26/06/2014 पासून सुरू होईल.

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

PC:3/D:/SRW/letter.doc